दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३२५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१९ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## किल्ले रायगड समुद्रमार्गे मुंबई गेट वे ऑफ इंडियाशी जोडण्याची योजना : खा.संभाजी राजे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

किल्ले रायगडावरील मराठा साम्राज्याच्या सोनेरी इतिहासाचे पुरावे साडेतीनशे वर्षे वादळ–पावसाने जमिनीखाली दडले गेले आहेत. रायगडावर जवळपास ३५० वाडे ११ मोठे तलाव आणि ८४ टाक्या आहेत. तसेच अनेक अशी गूढ स्थळे आहेत त्याचा अभ्यास आणि उत्खनन वेगाने होण्याची गरज असल्याचे रायगड विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदार संभाजी राजे छत्रपती यांनी सांगितले. पाचाड येथील ८८ एकर जागेत शिवसुष्टी, मराठ्यांच्या गामिनीकावा युद्धाचे प्रत्यक्ष थरार दर्शविणारा उपक्रम हाती घेण्याचा मानस आहे. शिवाय रायगड किल्ला सी फोर्ट सर्किट टुरिझम योजनेंतर्गत मुंबई गेट ऑफ इंडियाकडून समुद्रीमार्गे जोडण्याचा प्रस्ताव असल्याचे ही संभाजी राजे यांनी सांगितले.

मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाच्या पत्रकारांनी गुरुवार दि. १७ रोजी किल्ले रायगडाच्या कामाची खासदार संभाजी राजे यांच्यासमवेत पाहणी केली. त्यावेळी राजे यांनी ही माहिती दिली. स्वराजाची राजधानी रायगड किल्ला १८१८च्या ब्रिटिश आक्रमणानंतर पूर्णतः दुर्लक्षित होता. १८२० ते १८८३ पर्यंत रायगड फॉरेस्ट खात्याकडे होता. त्यामुळे तेथे कोणी गेल्याचा पुरावा नाही. शिवाय रायगडाची माहिती सांगणारी प्रत्यक्षदर्शी कोणीही व्यक्ती जीवित असल्याचे उदाहरण नाही. त्यामुळे रायगडावरील अनेक स्थळांचा पुराव्यासह परिचय देणे कठीण आहे.

पुरातत्व खात्याने हाती घेतलेल्या उत्खननात तीन चार वाड्यांचा शोध लागला आहे. शिवाय उत्खनन मिळत असलेल्या दस्तावेजावरून मराठा साम्राजाचा अधिक सखोल अभ्यास करता येईल. मात्र, पुरातत्व खात्याकंदील मनुष्यबळ आणि कामाचा वेग पाहता त्यांनी रायगड विकास प्राधिकरणासोबत काम हाती



घेतल्यास लवकर काही कामे पूर्ण करता येतील, अशी माहिती खासदार संभाजी राजे यांनी दिली.

शिवाय पाचाड येथील ८८ एकर जमीन संपादनाची प्रक्रिया पुर्णत्वाकडे आहे. या जागेत महाराजांच्या पराक्रमाची माहिती, त्यांचे सहकारी राहिलेल्या




सुभेदाराची ओळख, मावळ्यांचे पराक्रम दर्शवणारी शिवसुष्टी, मराठ्यांच्या गामिनी कावा युद्धाचे प्रत्यक्ष थरार शिवप्रेमींना अनुभवता यावा असा काही जागेत उपक्रम, अभ्यासकांसाठी अभ्यास केंद्रे हाती घेण्याचा मानस असल्याचे राजे यांनी सांगितले. शिवाय रायगड किल्ला सुशोभीकरणाचे काम सुरु असून नाणे दरवाजा येथील एका बुरुजाचे दगड खोऱ्यातुन शोधून काढण्यात यश मिळाले आहे. शिवाय वाड्याप्रमाणे राजवाडे उत्खननाची परवानगी सुद्धा केंद्राकडून मिळाली असल्याचे राजे यांनी सांगितले.

दरवर्षी किल्ले रायगडास भेट देणाऱ्या शिवप्रेमीची संख्या वाढत आहे. त्यांना किल्ला व्यस्थित फिरता यावा म्हणून शिवकालीन रस्ते पायवाटा तयार करण्याचे काम सुरु आहे. सोबत किल्ला रायगड हा मुंबई गेट ऑफ इंडियाशी समुद्रामार्गी जोडून तो सी फोर्ट सर्किट टुरिझम योजनेंतर्गत पर्यटकांसाठी उपल्बध व्हावा असा प्रस्ताव आहे. गेट ऑफ इंडियाकडून निघाल्यावर खंडेरी, उंदेरी पुढे अलिबाग पदमदुर्ग तसेच मुरुड जंजिरा करून शेवटी महाड मधील सावित्री नदी पुलाजवळ एक जेटी बांधून ३२ कि.मी. असलेला किल्ले रायगड एकदिवसात पाहता यावा अशी संधी पर्यटकांना उपलब्ध व्हावी अशी योजना आहे. त्यासाठी मेरिटाइम खातेही अनुकूल असून लवकर जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडून तो सरकारकडे सादर केला जाण्याची शकता असल्याची माहित संभाजी राजे यांनी दिली. सध्याचा रोप वे हा पुरातत्व खात्याचा आहे. त्याची क्षमता एका वेळेस १८ लोकांची आहे. दक्षिण भारतात,परदेशात आणि गिरनार येथे याही पेक्षा आधुनिक असे रोप वे आहेत. तशाच रोप वे ची निर्मिती येथे व्हावी अशी माझी भूमिका असल्याचे खासदार राजे यांनी सांगितले.

## काळनदीच्या पात्रात रात्रीची मासेमारी करणाऱ्यावर मगरीचा हल्ला





**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांवच्या काळ नदी पात्रात रात्री ९.३० वा. च्या सुमारास येथिल ब्रिटीश–कालिन पुलाखालील पाण्यात मासेमारी करीता गेलेल्या नितीन पवार या तरुणावर मगरीने अचानक हल्ला केल्याची थरारक घटना बुधवार दि.१६ फेब्रुवारी रोजी घडली आहे. या हल्यात मगरीने तिच्या जबड्यात नितीनचा पाय पकडला पण नितीनने झटका मारुन पाय सोडवल्याने त्याच्या जीवावरचे संकट पायावर निभावले, पायाला किंचीत फ्रॅक्चर व जखम झाली आहे. सुदैवाने जवळच असलेला नितीनचा भाऊ सचिन पवार व संजय काळे तसेच येथील झोपडपट्टी वासियांनी घटनास्थळी धाव घेतल्याने नितीनच्या जीवावरचे संकट टळले. दरम्यान घटनेची चाहूल लागताच मदतनीस धावून आल्याने त्याचे प्राण वाचले आहेत.

सदर घटनेची सविस्तर माहिती अशी की माणगांव काळनदी किनारी झोपडपट्टीत राहणारे सचिन बाबा पवार यांचे भाऊ नितीन बाबा पवार यांनी काळ नदीच्या पात्रात मासे पकडण्यास अगोदरच जाळे (कंडाळ) पसरले होते, ते जाळे काढण्यासाठी नितीन नदीच्या पात्रात उतरला असता अचानक मगरीने त्याच्यावर प्राणघातक हल्ला केला. दरम्यान स्वतःला वाचविण्यासाठी नितीनने आरडओरड केल्याने जवळच अस–लेला त्याचा भाऊ सचिन पवार व संजय काळे तसेच येथील झोपडपट्टीतील काही लोकांनी घटनास्थळी धाव घेऊन नितीन पवारचे प्राण वाचविले. या हल्ल्यामध्ये .../२

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पेण येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयास दिली भेट

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामत यांनी शासकीय तंत्रनिकेतन पेण या संस्थेस भेट दिली. यावेळी उदय सामंत यांनी संस्थेस भेट दिल्यावर संस्थेच्या पूर्वीच्या व आताच्या परिस्थितीबाबत संस्थेचे प्राचार्य व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. त्यानंतर संस्थेचे प्राचार्य डॉ. एस.एस.भामरे यांनी संस्था करीत असलेल्या विकासात्मक कामांचे सादरीकरण केले. त्यांनी संस्थेत प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांचे १००% प्रवेश नियमितपणे होत असल्याचे तसेच निकालाची उज्वल परंपरा सातत्याने राखण्यात येत आहे, असे डॉ. एस. एस. भामरे यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सामंत यांना सांगितले. .../२



## तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना दुरूस्तीसाठी तातडीने २५ लाखाची तरतूद करा : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**



म्हसळा तालुक्यातील पाभरे धरण प्रकल्पामधुन कार्यान्वित असलेली तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना प्रदीर्घ कालावधीनंतर जीर्ण झाली आहे. ऐन पाणी टंचाईच्या काळात चार ग्राम पंचायतीतील ८ गावे ४ वाड्यांत तीव्र पाणी टंचाई निर्माण होते. सद्यस्थितीत योजनेचे पाईपलाईन सकलप गावाजवळ नादुरुस्त होऊन गळती लागल्याने काही गावात पाणी पुरवठा बंद आहे. योजनेचे ठेकेदार थातुरमातुर उपाययोजना करून खंडीत पाणी पुरवठा सुरळीत चालू करण्याचा प्रयत्न करतात तो पर्यंत फार विलंब झालेला असतो. असे असताना त्यावर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी तोंडसुरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना समिती अध्यक्ष माजी सभापती महादेव पाटील आणि सदस्य यांनी खासदार सुनिल तटकरे आणि पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे योजनेच्या दुरुस्ती करणेसाठी आवश्यक शासकीय निधीची मंजुरी करण्यात यावी तसेच या योजनेस खरसई धरण प्रकल्पामधून नवीन योजना मंजुर करण्यासाठी प्रत्यक्ष भेट घेऊन मागणी केली असता खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे यांनी सुतारवाडी येथे तोंडसुरे पाणी पुरवठा कमिटी, सभापती, उपसभापती, सरपंच, ग्रामस्थ, गटविकास अधिकारी, रायगड जिल्हा परिषदेचे संबंधीत शासकीय अधिकारी, प्रारूप आराखडा तयार करणाऱ्या एनजीएस कंपनीचे अधिकारी यांची संयुक्तिक मिटिंग घेऊन तोंडसुरे पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीसाठी २५ लक्ष रुपयांचे निधीची तरतूद केली आल्याचे सांगून मिटिंगमध्ये अधिकारी वर्गास मंत्रालयात फोनवर संपर्क करून पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच नवीन योजनेचा लागलीच आराखडा तयार करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कडुन आवश्यक योजनेला मंजुरी व आवश्यक निधीची उपलब्धता करून देण्यात येणार असल्याचे सांगितले.

खा.सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे यांचे आदेशानु–सार रायगड जिल्हा परिषदेचे मार्फत जलजीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत खरसई धरण प्रकल्पामधुन सुधारित योजनेचा प्रारूप .../२

## कर्जत नगरपरिषदेच्या वतीने अनेक कामांचे लोकार्पण

### नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगर परिषद स्वच्छ व सुंदर कर्जतच्या दिशेने वाटचाल करत आहे कर्जत नगर परिषद क्षेत्राच्या सौंदर्यात भर पडण्यासाठी कर्जत नगर परिषदेने कोपरा गार्डन संकल्पना राबवली आहे, या कोपरा गार्डनच्या माध्यमातून नगरपरिषदेने अनेक ठिकाणी स्टॅच्यू उभारले आहेत त्याचा लोकार्पण सोहळा आज संपन्न झाला.



थेट नगराध्यक्ष च्या निवडणुकीत विजयी ठरलेल्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार सांभाळला या घटनेला आज दि.१८ फेब्रुवारी २०२२ रोजी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाला तसेच त्यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून कर्जत नगरपरिषदेने स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेतून बांधकाम केलेल्या कोपरा गार्डन कर्जत सुशोभीकरण तसेच रस्ते गटार बांधकामाचे लोकार्पण सोहळा नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, नगरसेविका भारती पालकर, सुवर्णा निलधे, विशाखा जिनगरे, प्राची डेरवणकर,संचिता पाटील, पुष्पा दगडे, मधुरा चंदन, स्वामिनी मांजरे, वैशाली मोरे तर नगरसेवक शरद लाड, विवेक दांडेकर, नितिन सावंत, बळवंत घुमरे, सोमनाथ ठोंबरे, राहुल डाळींबकर, उमेश गायकवाड उपस्थित होते.

कर्जत नगर परिषद क्षेत्रातील भिसेगाव येथील गजानन महाराज मंदिर, भिसेगाव खिंड,मुद्रे आय लव यू कर्जत, एक्साईज बँक, कोतवाल नगर, कोर्टासमोर, महावीर पेठ, पिंटो गॅस एजन्सी जवळ, कचेरी रोड, योगा, .../२



# विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालया समोर छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी होणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सालाबादप्रमाणे यावर्षीही दि १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालया समोर उत्साहात साजरी होणार आहे.

दर वर्षी शिवजयंती अनोख्या प्रकारे साजरी करण्याचा मानस विक्रांत पाटील यांचा असतो. मागील वर्षी पनवेलकरांसाठी खास शिवजयंती निमित्त शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन ठेवण्यात आले होते व खास रायगडावरून शिवज्योत दर्शनासाठी आणली होती. यावर्षीही अश्याच अनोख्या प्रकारे शिवजयंती साजरी होणार आहे.

यावर्षीही रायगडावरून शिवज्योत आणली जाणार आहे त्याच बरोबर शिवचरित्राचा चलचित्र देखावा तयार करण्यात आला आहे. सकाळी ११.३० ते रात्री ९.३० यावेळात शिवज्योत आणि देखावा नागरिकांच्या दर्शनासाठी खुला राहणार आहे.

तसेच संध्याकाळी ५.३० वा.महाराजांच्या जिवनावर आधारित शिवकल्याण राजा गीतांचा कार्यक्रम आणि रात्री ८ वा. जेष्ठ, तरुण, व्यवसायिक, विद्यार्थी वर्गाला उपयुक्त ठरेल खास छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास यांच्यावर आधारित समर्थांचे नेटवर्क किर्तन सादर करणार आहेत कॉर्पोरेट किर्तनकार समीर लिमये नागरिकांनी नेहमीच आपण आयोजित केलेल्या शिवजयंतीला उदंड प्रतिसाद दिला आहे यावर्षीही अनोख्या प्रकारे साजरा होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला नागरिक उदंड प्रतिसाद देतील अशी अपेक्षा यावेळी नगरसेवक विक्रांत पाटील यांनी व्यक्त केली.

# नवीन पनवेल कोमसापच्या अध्यक्षपदी गणेश कोळी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी गणेश कोळी यांची निवड झाली आहे. नवीन पनवेलच्या के.आ.बांठीया विद्यालयात प्रा.चंद्रकांत मढवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत २०२१ ते २०२४ या कालावधीकरिता नवीन कार्यकारणी सर्वानुमते निवडण्यात आली.

या कार्यकारिणीत उपाध्यक्ष रामदास गायधने, सचिव योगिनी वैद्, सहसचिव प्रा.अजिनाथ गाडेकर, खजिनदार गणेश म्हात्रे, कार्यकारणी सदस्य सुमंत नलावडे, चित्रलेखा जाधव, संतोष सुतार, मंदाकिनी हांडे, विजय पवार, जिल्हा प्रतिनिधी स्मिता गांधी, युवाशक्ती प्रमुख अमोल म्हात्रे, सल्लागार अॅड. प्रा. चंद्रकांत मढवी, ज्योत्स्ना राजपूत यांची निवड करण्यात आली. या कालावधीत नवीन पनवेल कोकण मराठी साहित्य परिषदेच्यावतीने कवी, साहित्यिकांसाठी विविध कार्यक्रम, मराठी



भाषा दिन, कवी कट्टा, पोपटी कवी संमेलने, साहित्य पुस्तके प्रकाशन आदी विविध उपक्रम राबविणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष गणेश कोळी यांनी बोलताना सांगितले.

# संत विचारांच्या उजळणीने संत रोहिदास जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुका चर्मकार समाजाच्या वतीने जामगाव येथे संत रोहिदास जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवात संत रोहिदासांच्या मौलिक विचारांची उजळणी करण्यात आली. यंदा छोटेखानी स्वरूपात आयोजन करण्यात आलेल्या या कार्यक्रमात संतवाणीच्या उजळणीने एक वेगळी ऊर्जा निर्मिती केली, तर संतांच्या मौलिक विचारांनी उपस्थित समाजबांधवांचे प्रबोधन झाले.



रोहा तालुका चर्मकार संघटना व संत रोहिदास नगर जामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने संत रोहिदास जयंतीउत्सवाचे छोटेखानी स्वरूपात आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपिठावर चर्मकार समाजाचे रोहा तालुकाध्यक्ष समीर नागोठकर, माजी तालुकाध्यक्ष प्रशांत म्हशीलकर, सरचिटणीस गणेश चांदोरकर, जामगाव स्थानिक पंचायतीचे अनंत जांभळे, सहचिटणीस राजन बिरवाडकर, जगदीश नागोठकर, ज्येष्ठ मार्गदर्शक रमेश पाबरेकर, उमेश चिपळूणकर, परेश सिलिमकर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची प्रतिमापूजन व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमास प्रारंभ झाले.

यावेळी ज्येष्ठ प्रमुख वक्ते शरद नागोठकर व पांडुरंग भोंनकर यांनी संताचे विचार मांडले, संतवाणीने विविध विषयांवरील व्याख्यानाने उपस्थित समाज बांधवांना मार्गदर्शन केले. कर्म करा, नित्य कर्मानेच धर्म घडले आणि त्यातूनच परमात्मा सिद्धी होईल, संत विचारधाराच मानवाच्या जगण्याचे साधन असून संतांनी दाखविलेल्या मार्गाचे आपण अनुकरण करून आपले जिवन सुंदर आणि समाधानी केले पाहिजेत, आदि संत रोहिदासांचे दोहे तसेच विचारांची उजळणी या कार्यक्रमात करण्यात आली.

समाजाचे रोहा तालुका सरचिटणीस गणेश चांदोरकर यांनी सूत्रसंचालन केले तर सहचिटणीस राजन बिरवाडकर यांनी आभार मानले, यावेळी महिलांच्या हळदीकुंकू कार्यक्रम संपन्न झाले, तर अल्पपोहाराने उत्सवाची सांगता झाली. जयंती उत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी तालुका पदाधिकारी यांच्यासह जामगाव रोहिदास नगर पंचायतीचे अनंत जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली जामगाव संत रोहिदास नगर येथिल आशा सेविका पौर्णिमा रवींद्र जांभळे, ज्योती जितेंद्र म्हशीलकर, अक्षता अंकुश जांभळे, उषा मधुकर जांभळे, राजश्री राजेंद्र म्हशीलकर, शीतल निलेश जांभळे, अनिता अनंत जांभळे, मनीषा गंगाराम जांभळे, रोहिणी चंद्रकांत जांभळे आदींनी परिश्रम घेतले. ओमायक्रोनच्या शासन नियमावलीमुळे यंदा उत्सव सोहळा छोटेखानी स्वरूपात करण्यात आले असून जयंतीनिमित्ताने होणारी महाराजांची मिरवणूक, समाजातिल विद्यार्थ्यांचे गुणगौरव तसेच विशेष सन्मान, महिला मंडळाचे कार्यक्रम आदी कमी करीत केवळ छोट्या स्वरूपात हा जयंतीउत्सव साजरा करीत आहोत, पुढील वर्षी जामगावामध्येच भव्य स्वरूपात जयंती उत्सव सोहळा साजरा करण्यात येईल असे समाजाचे तालुकाध्यक्ष समीर नागोठकर यांनी यावेळी सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## काळनदीच्या पात्रात रात्रीची मासेमारी करणाऱ्यावर मगरीचा हल्ला

नितीन पवारच्या डाव्या पायाला मोठ्या प्रमाणात जखम झाली असून माणगांव उपजिल्हा रुग्णालयांमध्ये त्यांच्यावर उपचार चालू आहेत. याबाबत उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. प्रदिप इंगोले यांचेशी प्रस्तुत पत्रकाराने संपर्क करुन माहीती घेतली असता, नितीनची प्रकृती स्थिर असुन पायाला किरकोळ फ्रॅक्चर व जखम झाली आहे. ज्या मगरीने हल्ला केला ती मगर सहा फूट लांबीची असावी असा तेथिल लोकांचा अंदाज आहे. काही वर्षापूर्वी या माणगांव काळ नदीच्या पात्रात मच्छिमारां च्या जाळ्यात अडकुन मृत अवस्थेतील मगर सापडल्याचे लोक बोलतात. या नदी पात्रात मगरींचे वास्तव्य अधुन मधुन आढळत असल्याने, आता मात्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शक्यतो माणसाची चाहुल लागताच मगर जवळ थांबत नाही. पाण्यात झेपावत गायब होते.

संबंधित वनविभाग अधिकाऱ्यांनी, मगरी आढळुन येणारे संवेदनशिल भागात त्यांचा उपद्रव होऊ नये यासाठी उपाय योजना व जनजागृती करावी, अशी माणगावकरांनी मागणी केली आहे . सदर परिस्थिती पाहता वेळ आणि काळ सांगून येत नाही, म्हणून नदीकिनारी राहत असलेल्या झोपडपट्टी-वासियांनी व नदीत मासेमारी करणार तसेच माणगांवकरांनी या घटनेची दखल घेत, या ठिकाणी वावरताना सावधानता बाळगावी. असे आवाहन माणगांव नगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी केले आहे

## पेण येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयास दिली भेट

या सादरीकरणानंतर मंत्री महोदयांची पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी संस्थेत होत असलेल्या विकासात्मक कार्याबाबत व संस्था करीत असलेल्या कौशल्य विकास कार्याबाबत प्रसारमाध्यमांसमोर समाधान व्यक्त केले. पत्रकार परिषदेत माहिती देताना त्यांनी सांगितले की, संस्थेच्या नवीन इमारतीकरीता १० कोटी ९२ लक्ष रुपयांचा प्रस्ताव तत्वत: मान्य करण्यात आला असून जिल्हा नियोजन समितीकडून संस्थेच्या सभागृहाकरिता अंदाजे रु.७५ लाखाची तरतूद मान्य करण्यात आली आहे. या सभागृहाच्या वापरासाठी नाममात्र शुल्क आकारण्यात येणार असून ते विविध सार्वजनिक कार्यक्रमांसाठी वापरण्यास देण्यात येईल. त्यातून होणाऱ्या उत्पन्नातून येथील देखभाल दुरूस्ती करण्याचे नियोजन आहे.

यावेळी १०० प्रवेश क्षमता असलेल्या मुलींचे वसतिगृह बांधण्याकरीता ५ कोटी रुपयांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सादर करावा, असे निर्देश त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.सुखदेवे यांना दिले. संस्थेतील विविध दुरूस्तीच्या कामांसाठी २ कोटी ३० लक्ष रुपयांच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले असल्याचेही श्री.सामंत यांनी सांगितले. रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या तीन जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरीता स्किल डेव्हलपमेंट सेंटरची स्थापना शासकीय तंत्रनिकेतन पेण या संस्थेत करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात येणार असून त्यासाठी रु.३० कोटीची तरतूद केल्याचेही त्यांनी सांगितले. संस्थेच्या प्राचार्यांनी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या सहकार्याने सी.एस.आर निधी मिळवून इनोव्हेशन सेंटर स्थापन करण्याकरीता पुढाकार घ्यावा, असेही मंत्री श्री.सामंत यांनी सूचित केले.

शासकीय तंत्रनिकेतन, पेण येथे आयोजित आढावा बैठकीत तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ.अभय वाघ, तंत्रशिक्षण मुंबई विभागीय कार्यालयाचे महासंचालक श्री.प्रमोद नाईक, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, मुंबईचे संचालक डॉ.विनोद मोहितकर, कार्यकारी अभियंता श्री.सुखदेवे, पेण प्रांताधिकारी श्री.विठ्ठल इनामदार यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन शासकीय तंत्रनिकेतन, पेण चे प्राचार्य डॉ.एस.एस.भामरे यांनी केले.

## २५ लाखाची तरतूद करा : ना.आदिती तटकरे

आराखडा तयार करण्याचे कामाला सुरुवात झाली असल्याचे कमिटीचे अध्यक्ष तथा माजी सभापती महादेव पाटील यांनी माहिती देताना सांगितले. योजनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे काम एनजेएस इंजेनिअर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने घेतले आहे. दिनांक १७ फेब्रुवारी रोजी खासदार, पालकमंत्री यांनी तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे व नवीन योजनेच्या कामास मंजुरी मिळवुन देण्यासाठी सुतारवाडी येथे आयोजित केलेल्या मिटींगला योजनेचे प्रकल्प सल्लागार डी.के.महाजन, गट विकास अधिकारी वाय.एम.प्रभे, पाणी पुरवठा उपविभागीय अधिकारी युवराज गांगुर्डे, सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदीप चाचले, पाणी पुरवठा कमिटीचे अध्यक्ष तथा माजी सभापती महादेव पाटील, सरपंच वनिता खोत,सरपंच इरशाद फकिह, सरपंच स्मिता जंगम, सरपंच अनंत कांबळे, समिती उपाध्यक्ष मनोज नाक्ती, सचिव स.भी.पवार, कमिटी सदस्य रियाजभाई फकिह, माजी सरपंच भिकु पाटील, माजी सरपंच मीना टिंगरे, तुकाराम अधिकारी, प्रकाश गाणेकर, अनिल टिंगरे, भालचंद्र गाणेकर, विश्वनाथ काजारे, मच्छिंद्र महाडिक आदी उपस्थित होते.

## कर्जत नगरपरिषदेच्यावतीने अनेक कामांचे लोकार्पण

शेतकरी, दहीवली लहान पुलाजवळ, दहीवली घाटा जवळ, सुनील चिक्की जवळ मंकी पॉईंट अशा ठिकाणी बनवण्यात आलेल्या सुमारे १ कोटी २ लाख ७ हजार ७५६ रुपये खर्च करून कोपरा गार्डने कर्जत सुशोभीकरण करण्यात आले आहेत. तसेच कर्जत पाटील आळी तेथील किशोर जाधव यांचे घर ते हसमुख शहा यांचे घरा पर्यत नगरपरिषद निधीतून ११ लाख १४ हजार २१४ रुपये खर्च करून गटाराचे चे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे व बामचा मळा आकुर्ले गावातील विशेष वैशिष्ट्यपूर्ण निधी मधून १९ लाख ९० हजार ३७२ रुपये खर्च करून अंतर्गत गटारे व रस्ता काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. अश्या सुमारे १ कोटी ३३ लाख १२ हजार ३४२ रुपयांच्या कामचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे भाई गायकर, मोहन ओसवाल,केतन जोशी, संदीप भोईर,गणेश मुंढे, भाजपचे दिपक बेहेरे, प्रशांत उगले, मंदार मेहेंदळे, मारुती जगताप आदी कार्यकर्त्यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**




राव साहेब

अॅड.जोतीबा रामचंद्र पाटील
अॅड.सुजाता जो. पाटील

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
प्रोबेट दि.चौ.अर्ज नं.१८५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०३/२०२२

श्री.शंकर नरसिंह मेकल
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.१९, मकरंद सोसायटी, प्लॉट नं.जी/४४,
शिवाजी चौक जवळ, सेक्टर १२, खारघर,
नवी मुंबई-४१०२१०, तालुका : पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार यांचे कै.श्री.नरसिंह ओबान्ना मेकल हे दि.०७/०६/२०१६ रोजी खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले. कै. श्री.नरसिंह ओबान्ना मेकल यांनी त्यांच्या नावे असलेल्या मिळकती संदर्भात मृत्यूपत्र बनविले आहे. सदर मृत्यूपत्रानुसार अर्जदार हे प्रोबेट अर्ज दाखल करत आहेत. कै.श्री.नरसिंह ओबान्ना मेकल यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**परिशिष्ट अ**
**मालमत्तेचे वर्णन**
**रुम नं.१९, मकरंद सोसायटी, प्लॉट नं.जी/४४,**
**सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०,**
**तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**एकूण क्षेत्रफळ : ३२ चौ.मी.**
**अॅग्रीमेंट मालमत्ता मुल्यांकन : रुपये २,७५,000/-**
**(रुपये दोन लाख पच्चाहत्तर हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने प्रोबेट दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्राकरची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे प्रोबेट दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.मुजावर साहेब

अॅड.सुधीर एस. म्हात्रे
अॅड.कल्याणी एस. पाटील-म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०३/२०२२

१) श्री.राकेश रोहिदास भोईर
रा.फ्लॅट नं.००३, बिल्डींग नं.०६ जी,
इंडिया बुल्स ग्रीन, कोन, ता.पनवेल, जि.रायगड
मुळ राहणार : रुम नं.०४, भोईर हाऊस, एल.बी.एस.मार्ग,
सोनापूर, भांडूप (प) मुंबई-४०००७८
२) श्रीमती.शारदा रोहिदास भोईर
रा.रुम नं.०४, भोईर हाऊस, एल.बी.एस.मार्ग,
सोनापूर, भांडूप (प) मुंबई-४०००७८
३) सौ.चैताली देवेंद्र केणी
रा.रुम नं.१०२, एकविरा भुवन, गावठाण रोड,
अंकित मेडीकल जवळ, भंडार वाडा, मालाड (प)
मुंबई ४०००६४ — अर्जदार

वरील अर्जदार यांचे वडील व पती कै.रोहिदास भालचंद्र भोईर हे दि.१२/०९/२०११ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार श्री.राकेश रोहिदास भोईर, श्रीमती.शारदा रोहिदास भोईर, सौ.चैताली देवेंद्र केणी (लग्नापूर्वीचे नाव चैताली रोहिदास भोईर) यांनी कै.रोहिदास भालचंद्र भोईर ह्यांचे सदरचा वारसदाखला हा भविष्यात / आवश्यकता लागल्यास केवळ गरजेचे असल्याने सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

वरील अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८ माहे ०२/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.इंदलकर सो

अॅड.के.बी.करावकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.१४३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०३/२०२२

श्री.नरेश राघो पाटील — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
नावडे विभाग — सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की,

१) सदर अर्जदारांची आजी कै.गणी गणू पाटील, यांचा मृत्यू दि.१०/१०/१९९० रोजी रा.रोहिंजण, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. अर्जदारांकडून त्यांच्या आजीच्या मृत्यूची नोंद महानगरपालिका पनवेल दप्तरी करण्याचे अनावधानाने राहून गेलेले आहे. सबब जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदारांचे त्यांच्या आजीच्या मृत्यूची नोंद होण्यासंबंधी महानगरपालिका पनवेल यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

२) सदर अर्जास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयाकडे ३० दिवसांचे मुदतीतच्या आत सादर कराव्यात. विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मा.न्यायालय अर्जदार यांचे आजीच्या मृत्यूची नोंद होण्यासंबंधी ग्रामपंचायत कामोठे यांस योग्य ते आदेश पारित करतील याची नोंद घ्यावी.

आज दि.१७/०२/२०२२ रोजी आमचे सहीने मे.कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

अर्जदाराचे वकील
अॅड.रोहिदास आगलावे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१९६/२०२२
नि.नं.७/ड

श्री.पद्माकर धर्मा पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.पो.केवाळे, पोस्ट मोरबे,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
निबंधक विवाह / जन्म मृत्यू नोंदणी/
ग्रामसेवक, ग्रामपंचायत केवाळे,
ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र ४१०२०६ — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.रामुबाई धर्मा पाटील यांचा मृत्यू दि.२७/०५/१९९२ रोजी राहत्या घरी केवाळे या मुक्कामी झालेला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या आईच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

कै.रामुबाई धर्मा पाटील यांचा मृत्यू, वरील नमूद केलेल्या ठिकाणी झालेला आहे. त्याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाची काही हरकत असेल, तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.१६/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्याायलयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

मा.ए.ए.गोडसे मॅडम

वकील मनोज वारंगे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०५/०४/२०२२

HARVINDER SINGH SANDHU
Age : 37 yrs, Occupation : Service
Residing at : Building No.F-8, Room No.3,
Sector-4 E, Kalamboli, Navi Mumbai,
Taluka-Panvel, Dist-Raigad 410218 — अर्जदार

अर्जदार क्र.१ यांचे वडील मयत कै.BALWINDER ALLIAS BALVINDER SINGH राहणार बिल्डींग नं.एफ-८, रुम नं.३, सेक्टर ४ ई, कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१८ यांचे दि.१७/०२/२०२१ रोजी Mississauga in Canada येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :-

SCHEDULE OF PROPERTY
1) That piece of land Known as Plot No.1489
on Road No.27 in Sector No.KWC of Kalamboli
containing by admeasurement 450 Sq.Mtrs.
Valued At Rs. 63,000/-
2) Shop Nop.3031, Plot No.119,
Bima Office premises Co-Operative Society Ltd., Kalamboli,
Valued At Rs.1,20,000/-
3) Shop No.3027, Plot No.119,
Bima Office premises Co-Operative Society Ltd., Kalamboli,
Valued At Rs.6,00,000/-
4) Apartment No.F-8/2:3, 2 nd Floor,
Sector-4 E/A, Kalamboli, Navi Mumbai
Valued At Rs.3,50,000/-

वरील मिळकती बाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## डिजिटल सदस्य नोंदणी सदर्भात काँग्रेस पक्षाची आढावा बैठक संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष आर. सी. घरत यांच्या अध्यक्षतेखाली एका विस्तारित बैठकीचे आयोजन काँग्रेस भवन पनवेल येथे करण्यात आले तसेच या बैठकीस महाराष्ट्र प्रदेश डिजिटल सदस्य नोंदणी कंट्रोल रूमचे प्रमुख आनंद सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.

सदर बैठकीस महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकालाला एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदन केले व डिजिटल सदस्य नोंदणी सदर्भात आढावा घेऊन जास्तीत जास्त सदस्य कसे जोडता येतील या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच या बैठकीस माजी जि.प अध्यक्ष अनंत पाटील, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष कॅप्टन कलावत, पनवेल शहर जिल्हा सरचिटणीस मल्लीनाथ गायकवाड, पनवेल शहर जिल्हा महिला अध्यक्षा निर्मला म्हात्रे, अरविंद सावळेकर, आदम ढालाईत, भक्तीकुमार दवे, माया अहिरे, लतीफ शेख, पूजा मोहन, जयवंत देशमुख, अरुण कुंभार, डॉ. राजेश घरत, राहुल जाणोरकर, राजीव चौधरी, भारती जळगावकर, मर्फी म्हसकर व आदि पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रावे गावाला निधी कमी पडू देणार नाही : आ.रविशेठ पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्याचा सर्वांगीण विकास करणे हाच ध्यास आपल्या मनात असल्याने परिसरात विकास कामांचा धडाका सुरू आहे. माझा जन्म गाव रावे गावात दोन कोटींच्या विकास कामांचे आज भूमीजन केले असून यापुढेही रावे गावाला निधी कमी पडू देणार नसल्याचे भाजप पेणचे आमदार रविशेठ पाटील यांनी जाहीर केले.

रावे गावातील जल जीवन मिशन अंतर्गत रावे, खोकरी,कासू मोरा, कोटा, पाणीपुरवठा योजना ८४ लाख, जेएसडब्ल्यु सीएसआर फंड तलाव सुशोभीकरण करणे २५ लाख,उघाडी जवळ संरक्षण भिंत बांधणे १७ लाख, नदि किनारी संरक्षण भिंत १० लाख, समाज मंदिर बांधणे १० लाख, शौचालय ७ लाख, अंतर्गत




रस्ते १५ लाख, अस्थी विसर्जन घाट २ लाख ४० हजार, शाळा दुरुस्ती १० लाख, पाणी टाकी दुरूस्ती ६ लाख, नविन अंगणवाडी इमारत ८ लाख ५० हजार, पाईप लाईन दुरूस्ती ४ लाख ५० हजार, मच्छी वटा ५ लाख, प्रवाशी शेड २ लाख या विविध विकासकामांचे भूमिपूजन, उद्घाटने आज करण्यात आले.

यावेळी आमदार रविशेठ पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, सरपंच संध्या पाटील, जेएसडब्ल्यु सीएसआर फंडाचे प्रमुख किरण म्हात्रे, गागोदे सरपंच शिवाजी पाटील आदिंसह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आमदार पाटील यांनी सांगितले की पेण तालुक्यापासून अल्पित असणारा रावे गाव अनेक विकासापासून वंचित राहिला होता मात्र आपण पहिल्यांदा मंत्री झालो आणि या गावाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम केले अनेक योजना गावासाठी राबविल्या आणि आता नुसता आमदार असूनही जवळपास दोन कोटींच्या वर विकासात्मक कामे करण्याचे ध्येय आपल्या मनात असल्याने येणाऱ्या काळात गावाचा अधिक विकास साधला जाईल असे त्यांनी शेवटी सांगितले.

# विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल १९ फेब्रुवारीला होणार सुरू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित (रजि.) प्रमाणित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल विलेपार्ले – (पूर्व ) (ISO प्रमाणित), हे संपूर्ण हिंदुस्तानाला परिचित आहे. कोरोनामुळे गेल्या २ वर्षांपासून प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल पूर्णपणे बंद होते. त्यामुळे गेल्या २ वर्षांपासून खेळाडूंना कोणत्याही क्रीडा प्रकाराचा सराव करता आला नाही. दरम्यान कोरोनाचे काही नियम शिथिल केल्यामुळे १९ फेब्रुवारी २०२२ रोजी शिवजयंतीच्या शुभ मुहूर्तावर कोरोनाच्या नियमांचे तंतोतंत पालन करून पुन्हा सुरू करण्यात येत आहे. या सुवर्ण संधीचा लाभ खेळाडूंनी घ्यावा असे आवाहन अध्यक्ष अरविंद प्रभू यांनी केले आहे.



प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेत पदक मिळवतात. क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संकुलाच्या ७ खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.

प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलात जलतरण, डायव्हिंग, जीम, जिमनॅस्टिक्स, आर्टीस्ट जिमनॅस्टिक्स, टेबल टेनिस, पिकल बॉल, स्केटिंग, आर्टीस्टीक्स स्केटिंग, तायक्वांदो, ज्युडो, कराटे, फुटबॉल, क्रिकेट, रायफल शूटिंग, बुद्धिबळ, कॅरम, मल्लखांब या खेळांचे राष्ट्रीय ख्यातीच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण दिले जाते. या शिवाय झुंबा एरोबिक्स, भरतनाट्यम, ओडिसी नृत्य, आशिष माने इन्स्टिट्युट ऑफ डान्स फॉम, आर. झोन डान्स या कलांचेही प्रशिक्षण दिले जाते. तसेच (एसआरसी) मसाज, स्टीम, सोना बाथची सोयही आहेत. कोरोना नियमांचे पालन करून हे संकुल सुरू करण्यात आले आहे.

संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू आणि सचिव डॉ मोहन राणे संकुलाचे सर्व विश्वस्त तसेच प्रत्येक क्रीडा खेळाचे प्रशिक्षक यांचे मोलाचे सहकार्य मिळते. अधिक माहितीसाठी प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, शहाजीराजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७ येथे तसेच ७७००९६७४२२, ८१०४९७१०३७, ८८६६५२६४९७, ०२२२६८२७४६१ या नंबर वर संपर्क साधा.

# रबाळे येथून चोरी झालेली स्कुटी खारघर वाहतूक पोलिसांनी केली हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रबाळे येथून चोरी झालेली स्कुटी खारघर वाहतूक पोलिसांनी हस्तगत केली आहे. खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश गावडे यांनी पोलीस नाईक सुरेश कासार व पोलीस अमलदार मयुर पाटील यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले आहे.

खारघर वाहतूक पोलीस नाईक सुरेश कासार व अमलदार मयुर पाटील हे नेहमीप्रमाणे खारघर शहरामध्ये वाहतूक कोंडी होऊ नये या करिता मोटर सायकलवरून गस्तीवर असताना उत्सव चौक, सेक्टर ५ जवळील डोंगरी गवतात एक निळ्या रंगाची होंडा एक्टिवा स्कुटी धूळ खाऊन पडलेली दिसून आली. स्कूटीचे सीट लॉक तुटलेले होते व पेट्रोल लॉकही तुटलेले होते. स्कुटीचा नंबर एमएच वीके ९३३८असा असून सदर पोलिसांनी गाडीचा नंबर तपास करता गाडीचा नंबर चुकीचा असल्याचे वाहतूक अंमलदार मयुर पाटील यांना कळाले. मग त्यांनी गाडीचा चेसिस नंबर व इंजिन नंबर या दोन्ही नंबरची चौकशी जवळील होंडा शोरूममध्ये तपास केला असता त्यांना गाडीचा खरा नंबर एमएच ४३ बीवी ७९१९ व गाडी मालक दिनेश कुमार पटेल (राहणार रबाळे) त्यांच्या नावावर असल्याचे कळाले. त्यांनी ताबडतोब फोन करून दिनेश पटेल यांना गाडीची ओळख पटवण्याकरता खारघर येथील वाहतूक शाखेजवळ बोलावले. दिनेश पटेल यांनी गाडी बघताच ही माझी स्कुटी आहे असे खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश गावडे यांना सांगितले. व दिनेश पटेल यांनी स्कुटी ३१ डिसेंबर २०२१ रोजी उशिरा रात्री सक्षम सोसायटी रबाळे येथून चोरी झाल्याचे सांगितले. त्यानी १ जानेवारी २०२२ रोजी याची तक्रार रबाळे पोलीस ठाण्यात नोंदवली. खारघर वाहतूक पोलिसांनी रबाळे पोलीस ठाण्यात चौकशी केली असता त्या गाडीचे नोंद असल्याचे रबाळे पोलिसांनी सांगितले. पुढील संपूर्ण तपासणी करून दिनेश पटेल यांचा मोठा भाऊ शंकरलाल पटेल यांना ही गाडी दिनांक १३ फेब्रुवारी२०२२ या दिवशी रबाळे पोलीस अंमलदार प्रकाश पाटील यांच्या साथीने देण्यात आली. खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश गावडे यांनी पोलीस नाईक सुरेश कासार व पोलीस अमलदार मयुर पाटील यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

# मल्हार महा.ई सेवा केंद्र संचालिका ज्योती पायगुडे विमा कंपनी कडून सन्मानित

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहरात मल्हार महा.ई सेवा केंद्र सूरू असुन या सेवा केंद्रातून शासनाच्या विविध सेवा योजनेचा लाभ तळा गाळा–तील जनतेला मिळत आहे.

केंद्राच्या पंतप्रधान पिक विमा योजने अंतर्गत भात व नाचणी पिकासाठी HDFC शीसे या कंपनीने रायगड जिल्ह्यासाठी ३वर्षासाठी नेमणूक केली आहे. शेतकरी या योजनेमध्ये बँक किंवा आपले सरकार केंद्र यांचेमाध्यमातून सहभाग घेऊ शकतात.सलग दोन वर्ष तळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी या सेवा केंद्रातून जास्तीत जास्त लाभ घेत असल्याने मल्हार सेवा केंद्र संचालीका ज्योती पायगुडे यांनी आपले सरकार केंद्र यांचेमाध्यमातूनजास्तीत जास्त शेतकऱ्यांनीशासनाच्या या योजनेमध्ये सहभाग घेण्यासाठी जनजागृती करून शेती विमा घेऊन निसर्गाच्या बदलत्या वातावरणामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन आर्थिक संकटात सापडला जातो. त्यामधून थोडी फार मदत (संरक्षण) शासनाकडून कृषी विभागाच्या माध्यमातून मिळण्यास मदत होते. शेतकऱ्यांनी विमा घेतल्याने कंपनीने सन्मान चिन्ह देऊन त्यांचा तालुका कृषी अधिकारी सागर वाडकर व कंपनी प्रतिनिधी पिंपळे यांच्या हस्ते सन्मानित केले करण्यात आले.




सोनवणे साहेब कोर्ट

अ‍ॅड.सुजाता जो. पाटील
८८७९४१६४८३

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
प्रोबेट दि.चौ.अर्ज नं.१७४६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१०/०३/२०२२

कुमारी.मनिषा जगदीश ढोके व इतर — अर्जदार
विरुद्ध
श्रीमती.कल्पना जगदीश ढोके — सामनेवाले

वरील अर्जदार नं.१ व २ यांचे वडील कै.श्री.जगदीश यशवंत ढोके हे दि.२५/०९/२०१९ रोजी नायर म्युन्सिपल दवाखाना आणि मेडीकल कॉलेज मुंबई येथे मयत झाले. मयत कै.श्री.जगदीश यशवंत ढोके यांचे नांवे असलेल्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

कै.श्री.जगदीश यशवंत ढोके यांचे नावे असलेल्या मालमत्तेचे वर्णन खाालीलप्रमाणे :–

**मालमत्ता परिशिष्ट**

**सदनिका नं. : अ–१०३, न्यू कर्तिक्य को.ऑप.हौ.सो., विठ्ठल मंदिर जवळ, सुकापूर, पनवेल, रायगड, महाराष्ट्र–४१०२०६**
**ॲग्रीमेन्ट मालमत्ता मुल्यांकन : रु.५,६३,२००/–**
**(रुपये पाच लाख त्रेसष्ठ हजार दोनशे मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Shri.Sonawane Judge

Adv. M.U.Solanke

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE (S.D.)
PANVEL, AT PANVEL
CIVIL M.A.NO. OF 1930/2021
Exh No. 8/D
Next Date : 30/03/2022

1) Bhagirati Maruti Patole — Applicant No.1
2) Pratap Maruti Patole — Applicant No.2
3) Govind Maruti Patole — Applicant No.3
4) Kavita Maruti Patole @ Kavita Bharat Tupe
All residing at Panvel, Raigad — Applicant No.4
V/s
NIL — Respondent

Whereas, the all Applicants herein have filed a Miscellaneous Application No.1930 of 2021 (hereinafter referred to as the said M.A.), for grant of Heirship Certificate under BOMBAY REGULATION VIII OF 1987 before the Court of the Civil Judge S.D. Panvel (Shri.Sonawane Saheb), in order to be declared as the legal heirs of deceased Maruti Tukaram Patole with respect to Flat bearing No.101, admeasuring 38.98 Square Meters carpet and 4.50 Square Meter terrace, 1st Floor, Shree Ganesh Co-operative Housing Society, Flat No.42, Sector-13, Kharghar, Taluka Panvel, District-Raigad, having full right and authority to inherit moveable and/or immovable assets, if any, of the said deceased Maruti Tukaram Patole.

Whereas last abode of deceased Maruti Tukaram Patole at Panvel, Raigad and he died on 16/05/2020 and therefore it has become necessary for all the Applicants obtain Heirship Certificate as stated above.

You the member of the public are hereby given notice to appear in the Court of the Civil Judge (S.D.) Panvel, in person or by pleader duly instructed and file your say/ objections if any within 30 (thirty) days from the date of publication, failing which said M.A. will be finally decided and adjudicated with the presumption theat there in no objection from anybody.

**SHCEDULE OF PROPERTY**

**Flat bearing No.101, admeasuring 38.98 Square Meters Carpet, & 4.50 Square Metere terrace, 1st Floor, Shree Ganesh Co-operative Housing Society, Plot No.42, Sector-13, Kharghar, Taluka Panvel, Dist-Raigad**

Given under my hand and seal on this 18/02/2022

Sd/-
Jr.Clerk
Civil Court (S.D.)
Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superitendt.
Civil Court (S.D.)
Panvel



अर्जदारातर्फे वकील
श्री.के.के.गोंधळी
अ‍ॅड.विजय गडगे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०३/२०२२

१) श्रीमती.रत्नप्रभा विठ्ठल भोसले
वय : ६२ वर्षे, धंदा : काहीनाही
२) कुमारी.निकिता नितीन भोसले
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
दोघेही रा.रो हाऊस नं.ए–१२, सुनैना हौसिंग सोसायटी, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
श्रीमती.रत्नप्रभा विठ्ठल भोसले हे
अर्जदार २ यांचे अज्ञानपालनकर्ता आहेत — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ निकिता नितीन भोसले हिची अज्ञान पालनकर्ती आजी आहे. अर्जदार नं.२ हिची आई मिना नितीन भोसले ही दि.०६/०२/२०१५ रोजी मयत झालेली आहे. तसेच वडील कै.नितीन विठ्ठल भोसले हे दि.२५/०६/२०२० रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार नं.२ हिच्या तसेच तिच्या खालील मिळकतीसंबंधी कायदेशीर नैसर्गिक पालक आहे असे जाहीर करून मिळणेकरिता मे.कोर्टामध्ये अर्ज दाखल केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे / गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पालेखुर्द | ६८ | १/ब | ०–४०–०० | ३.२३ |
| | ६८ | १/ड | ०–४०–०० | ३.२३ |
| | ६८ | १/क | १–१३–०० | ११३० |
| | ६८ | १/१/अ | ०–५०–०० | ४.१० |
| | ६८ | १/१/ब | ०–४०–०० | ३.४५ |
| | ६८ | १/इ | ०–४०–०० | ३.२२ |

अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ निकिता नितीन भोसले हिची कायदेशीर नैसर्गिक पालक आहे का कसे? याबाबतीत कोणासही काही सांगावयाचे असल्यास, हरकत उपस्थित करण्याची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात. जर या ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट अर्जदार नं.१ व २ ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करेल आणि अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ यांची कायदेशीर नैसर्गिक पालक आहे असे सिद्ध झाल्यास तशा प्रकारचे आदेश मंजूर करेल.

आज दि.१८/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**अति.जिल्हा.न्या.पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**अति.जिल्हा.न्या.पनवेल**



प्रो.जमा. २–२५

अर्जदाराचे वकील
अ‍ॅड.श्रुती द. शिंदे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०३/२०२२

कै.पांडुरंग नारायण देशमुख (मयत) तर्फे वारस
१) श्रीम.सुनंदा पांडुरंग देशमुख
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सौ.सुनिता पुरुषोत्तम मांडे
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.तळेगाव, पोयंजे, रायगड
३) श्री.वामन पांडुरंग देशमुख
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.वसंत पांडुरंग देशमुख
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.नितीन पांडुरंग देशमुख
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
वरील सर्व १, ३ ते ५ रा.देशमुख आळी,
गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी कै.पांडुरंग नारायण देशमुख हे दि.११/१०/२०२० रोजी मौजे : एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ. नं. | संचिका क्र./ नोड | सर्व्हे नंबर हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | सेक्टर, भूखंड क्र. क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | गव्हाण–३६७, उलवे नोड | ३४१/२<br>३४४/१ | ०–४५–०<br>०–२०–६ | सेक्टर–१३, भूखंड क्र. अे/५३, क्षेत्र ६०० चौ.मी. |
| २ | उलवे नोड | २८७/२अ | ०–१२–० | सेक्टर–२६, भूखंड क्र.११/सी, क्षेत्र १९० चौ.मी. |
| ३ | गव्हाण–५१८ | ३४५/८ | ०–०३–५ | |
| ४ | गव्हाण–५८ | ८८/अ/२३<br>३७१/३<br>३७४/१ | ०–०४–०<br>०–१७–७<br>०–०९–० | |

कै.पांडुरंग नारायण देशमुख यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १८/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारांचे वकील श्री.एकनाथ जी. खुटले

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२०६४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०३/२०२२

श्री.हनुमान हाशा उर्फ हासू पाटील
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
रा.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.हाशा उर्फ हासू रामजी पाटील हे दि.३०/०७/१९९१ रोजी मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून, त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| कळंबोली–७२ | ३९ | १ | ०–१७–४ |
| | ३९ | ४ | ०–०८–८ |
| | ३९ | ९+१०+११ अ | ०–४५–५ |
| कळंबोली–७२ | ४७ | ७ अ | ०–०६–२ |
| | ४१ | ६ | ०–३५–५ |
| कळंबोली–७२ | १८ | १ | ०–१३–४ |
| कळंबोली–७२ | ४१ | १६ | ०–०१–३ |
| | ४१ | १७ ब | ०–०४–१ |
| | ४४ | क | ०–०१–० |
| | १२३ | ३ पै | ०–०७–४ |
| कळंबोली–७२ अ | ७५ | ६ | ०–२९–८ |
| | ५ | १३४ | ०–२४–८ |
| | ६ | १३५ | ०–३१–० |
| कळंबोली–७२ अ | ४५ | ४+५+९+७ | ०–४५–८ |
| कळंबोली–७२ ब | ५७ | १ पै | ०–१७–१ |
| कळंबोली–७२ ब | ६० | १ ब | ०–१८–२ |
| | ६६ | २ | ०–२५–९ |
| कळंबोली–७२ क | ५२ | ७ | ०–२१–७ |
| कळंबोली–७२ क | ७७ | १ | ०–५१–४ |
| कळंबोली–१६७ | २५ | ३ अ | ०–४४–६ |
| | २५ | ३ ब | ०–२६–८ |
| कळंबोली–४२ | ४० | ६ अ | ०–११–४ |
| कळंबोली–२३ | ७५ | ७ | ०–२१–५ |

अर्जदार हे कै.हाशा उर्फ हासू रामजी पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## कायद्याचे पालन करून शिवजयंती साजरी करा : सुनील पाटील

**दै.रायगड नगरी । उरण**

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दि १९ फेब्रुवारी २०२२ रोजी संपूर्ण देशात, संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, समाजात शांतता राहावी या दृष्टीकोणातून तसेच कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशानुसार शिवजयंती उत्सव साजरी करण्या बाबत मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने उरण मधील शिवजयंती साजरी करणारे मंडळ, संस्था, संघटना व उरण पोलीस स्टेशन यांच्यात संयुक्त बैठक उरण पोलीस स्टेशन येथे दुपारी १२:१५ वाजता संपन्न झाली. यावेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील, गुन्हे विभागाचे अधिकारी सुहास चव्हाण, पोलीस कर्मचारी युवराज जाधव, भीमराव शिंदे तसेच दुर्ग मावळा प्रतिष्ठान, शिवराज युवा प्रतिष्ठान, सह्याद्री प्रतिष्ठान, शिवसेना शिवजयंती उत्सव मंडळ आदी विविध संस्था, संघटना, मंडळाचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.शिवजयंती साधेपणाने, कोरोनाचे सर्व नियम पाळत, शासनाच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन करत सर्व शिवप्रेमी संस्थांनी, संघटनानी, शिवभक्तांनी साजरी करावे. कोणत्याही संघटनेने, संस्थेने प्रभात फेरी बाईक रॅली अथवा मिरवणुका काढू नयेत असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांनी केले आहे. कोणी कायद्याचे उल्लंघन केल्यास त्या मंडळावर /संस्थावर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही सुनिल पाटील यांनी यावेळी दिला.

## मधुबनचे कविसम्मेलन वृध्दांना आनंददायी : चंद्रकांत मुकादम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उरणचे ज्येष्ठ नागरिक दरमहिन्याच्या १७ तारखेला विमला तलावावर कोमसाप मधुबन कट्ट्यावर आमचा आनंद वाढविणारे कविसम्मेलन ऐकण्यासाठी येतो. असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत मुकादम यांनी मांडले. यावेळी बाळाराम म्हात्रे, सुर्यकांत दांडेकर, रमेश सूर्यवंशी, क.श्रा घरत, मारुती तांबे, मोहन म्हात्रे यांनी यावेळी विचार मांडले. कविसम्मेलनात रायगडभूषण प्रा.एल बी सर,भ.पो. म्हात्रे, संजय होळकर, रामचंद्र म्हात्रे, अजय शिवकर,वसंत राऊत, नामदेव बरतोड, संग्राम तोगरे इत्यादींनी कविता सादर केल्या. यावेळी ज्येष्ठ नागरिक रमेश माळी, संजय चिंबळकर,भुवनेश्वर पाटील, अनिल म्हात्रे, माधव शेलार, नारायण राव, दत्ता निळवर्ण,चंद्रकांत म्हात्रे, राम पाटील इ.नी कवितांचा आनंद घेतला. संजय होळकर यांनी सुरेख सूत्रसंचालन केले.

# पोलादपूर नगरपंचायतीच्या सभापतींची निवड झाली पण खातेवाटपामध्ये डावलण्याचं खातं गेलं कोणाला?

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरच्या खातेवाटपामध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये उपनगराध्यक्ष अथवा नगराध्यक्षपदी डावलण्यात आलेल्यांना ज्या खात्याचं सभापतीपद दिलं जात होते. ते खातं कोणाला मिळाली याची चर्चा सुरु असताना त्या खात्यासाठी अपेक्षेप्रमाणेच निवड झाल्याने गेल्यावेळी ज्यांचा शब्द सुरूवातीला प्रमाण मानला गेला त्यांचा शब्द यावेळी प्रमाण मानला जाऊ नये, यासाठी खेळी झाल्याचे दिसून येत आहे. मात्र, सामाजिक स्तरावर पक्षसंघटना या सभापतींना पुढच्या सव्वा वर्षांच्या कालावधीम ध्येदेखील नगराध्यक्षपदाची संधी देऊ शकेल, असा विश्वास संबंधित खात्याच्या सभापतींना असल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सोनल प्रकाश गायकवाड यांना पदसिध्द स्थायी समितीचे सभापतीपद आणि सर्व सभापतींना या स्थायी समितीचे सदस्यपद देण्यात आले आहे. उपनगराध्यक्ष नागेश पवार यांना सार्वजनिक आरोग्य आणि मालमत्ता कर सभापतीपद, सिध्देश शेठ यांना सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपद, प्रसाद इंगवले यांना पाणीपुरवठा व दिवाबत्ती समिती सभापतीपद, मनोज प्रजापती यांना नियोजन, अर्थ, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य सभापतीपद तर महिला व बालकल्याण सभापतीपदी अस्मिता पवार यांची निवड झाली.

नगरपंचायत पोलादपूरच्या पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीप्रमाणे दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीमध्येदेखील महिला सर्वसाधारण पदाचे आरक्षण नगराध्यक्षपदासाठी जाहिर झाल्याने यावेळी पहिल्यावेळीसारखा दुसऱ्या समाजाला नगराध्यक्षपद देण्याचा पर्याय असूनही मागणी नव्हती. त्यामुळे प्रभारी शहरप्रमुख प्रकाश गायकवाड यांच्या पत्नी सोनल गायकवाड यांना ही नगराध्यक्षपदाची महिला सर्वसाधारण आरक्षणानुसार संधी विनासायास मिळाली तर मागील पंचवार्षिक निवडणुकीच्या दुसऱ्या अडीच वर्षामध्ये तीन नगराध्यक्ष झालेल्यांपैकी नागेश पवार यांना उपनगराध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. त्यावेळी गटनेतेपद बिनविरोध विजयी झालेल्या उमेश पवार यांच्याकडे असतानाद–`खील दुसऱ्या अडीच वर्षांमध्ये उमेश पवार यांच्या आजारपणामुळे त्यांची वर्णी नामाप्र नगराध्यक्षपदाच्या आरक्षणासाठी लागू शकली नव्हती.

पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये उपनगराध्यक्ष अथवा नगराध्यक्षपदाची संधी न देण्यासाठी एक खाते ओळखले जात होते. दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये हे खाते अशा व्यक्तीकडे गेले आहे, की त्यामुळे या नगरपंचायतीच्या सभापती पदाच्या वाटपातून काही वेगळ्याच शक्यता ध्वनित होत आहेत. मात्र, सामाजिक स्तरावर पहिल्या अडीच वर्षातील पुढील सव्वा वर्षे संधी मिळेल, अशी खात्री व्यक्त होत आहे.

# पाली नगरपंचायत सभापती निवड बिनविरोध

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायतीच्या विषय समिती सभापती निवडीसाठी पाली तह–सील कार्यालयात हिरकणी कक्षात विशेष सभा संपन्न झाली. या समित्यांची सभापती निवड ही बिनविरोध झाली आहे.

यामध्ये सार्वजनिक बांधकाम समिती सभापती पदी प्रणाली पाटील, स्वच्छ्ता व वैधक सार्वजनिक आरोग्य समिती सभापतीपदी विनायक जाधव, पाणी पुरवठा व जलनिसरण समिती सभापतीपदी सुलतान बेनसेकर, महिला व बाल कल्याण, पर्यटन समिती सभापतीपदी नलिनी म्हात्रे यांची निवड झाली आहे. तर नियोजन, विकास, क्रीडा, सांस्कृतिक व दिवाबत्ती समिती सभापतीपदी उपनगराध्यक्ष आरिफ गफुर मणियार यांची निवड झाली आहे.

राष्ट्रवादी व शेकाप आघाडीकडून पाच अर्ज भरले होते ते सर्व वैध ठरले. तसेच प्रतिस्पर्धी नसल्याने सर्व सभापती निवड बिनविरोध झाल्याचे उपविभागीय अधिकारी डॉ. माने यांनी जाहीर केले. प्रत्येक समितीसाठी एकमेव अर्ज आल्याने निवडी बिनविरोध झाल्या.

सभापती निवडीचे काम उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने व मुख्य कार्यकारी अधिकारी अंगाई साळुंखे यांनी पाहिले. यावेळी नगराध्यक्षा गीता पालरेचा, माजी आमदार धैर्यशील पाटील, जि. प. सदस्य सुरेश खैरे, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, रमेश साळुंखे, संदीप दपके, संजोग शेठ, नगरसेवक व नगरसेविका, स्वीकृत नगर–सेवक तसेच नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम समिती – सभापती – प्रणाली निशिकांत पाटील, सदस्य – गणेश सावंत, प्रितिजा जोशी, पराग मेहता, सचिन जवके. स्वच्छ्ता व वैधक सार्वजनिक आरोग्य समिती – सभापती– विनायक विठ्ठल जाधव, सदस्य – सुधीर भालेराव, मधुरा टाकळेकर, सुधाकर मोरे, प्रतीक्षा पालांडे, पाणी पुरवठा व जलनिसरण समिती– सभापती – सुलतान बेनसेकर, सदस्य – आशिक मणियार, सुधीर भालेराव, सुमेध खैरे, कल्याणी दपके महिला व बाल कल्याण, पर्यटन समिती– सभापती– नलिनी गणेश म्हात्रे, उपसभापती – मधुरा टाकळेकर, सदस्य – जुईली ठोंबरे, आशिक मणियार, प्रित–ीजा जोशी, नियोजन, विकास, क्रीडा, सांस्कृतिक व दिवाबत्ती समिती – सभापती– उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, सदस्य – सुधीर भालेराव, पराग मेहता, दीप्ती पारधी, आशिक मणियार



# नवी मुंबईत मनसेचे शिवजनसंपर्क अभियान

## मनसे नेते अमित राज ठाकरे यांच्या हस्ते अभियानाचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

महाराष्ट्राचे कुलदैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सवापासून नवी मुंबई शहरात दि.१९ फेब्रुवारी ते ०२ मार्च या कालावधीत मनसे आयोजित शिवजनसंपर्क अभियानाला सुरुवात होणार आहे. मनसे नेते अमित राज ठाकरे यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ होणार असल्याचे शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. या अभियाना अंतर्गत सुमारे दीड ते दोन लाख नवी मुंबईकरांशी थेट संवाद व २० ते २५ हजार नवी मुंबईकरांच्या घरोघरी जाऊन भेटी घेणार असल्याचे मनसेने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. तसेच नवी मुंबईतील सर्व मनसे शाखेतील महाराष्ट्र सैनिक रक्तदान शिबिरात अथवा नजीकच्या रुग्णालयात जाऊन रक्तदान करून छत्रपती शिवरायांना मानवंदना देणार असल्याचे गजानन काळे यांनी म्हटले आहे.

दिनांक २० फेब्रुवारी रोजी मनसे नेते अमित राज ठाकरे यांच्या हस्ते नेरूळ, जुईनगर व घणसोली या प्रभागांमध्ये मनसे शाखांचे उद्घाटन करून शिवजनसंपर्क अभियानाला सुरुवात होणार असल्याचे मनसेने म्हटले आहे. या अभियाना अंतर्गत मनसेच्या वतीने नवी मुंबईत विविध ठिकाणी शिवगारद स्पर्धा, शिव व्याख्यान, आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, मिरवणुका व विविध सांस्कृतिक कार्यक्रम, दांड पट्टा व कसरती, मनसे वृत्तपत्र वाचनालय उद्घाटन, आधार कार्ड मोबाईल लिंक शिबिर, पंतप्रधान जनधन खाते योजना, रेशन कार्ड शंका निवारण शिबिर, लाईट बिल आणि मालमत्ता कर शिबिर, ई श्रम कार्ड शिबिर, व प्रत्येक मनसे शाखेत शिवजयंती उत्सव साजरा करणार असल्याचे मनसे उपशहर अध्यक्ष निलेश बाणखेले व सविनय म्हात्रे यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

या शिवजनसंपर्क अभियाना अंतर्गत नवी मुंबईकरांशी थेट भेटून संवाद साधणार असल्याचे व या संवादातून नवी मुंबईकरांच्या शहर विकासाबाबत विचार, सूचना व दृष्टिकोन जाणून घेणार असल्याचे मनसे उपशहर अध्यक्ष प्रसाद घोरपडे व विनोद पार्टे यांनी म्हटले आहे. या भेटींमध्ये नवी मुंबई शहरातील महिला भगिनी, विविध बचत गट, तरुण युवक मंडळे, पर्यावरणप्रेमी, डॉक्टर, अधीवक्ते, वास्तूविशारद, अभियंते, तसेच कला क्षेत्रा–तील मंडळी, कामगार वर्ग, तसेच बुद्धिजीवी लोकांशी थेट भेटून त्यांचे शहर विकासाबाबत संकल्पना, विचार व दृष्टिकोन जाणून घेणार असल्याचे शहर सचिव विलास घोणे, सचिन कदम, रुपेश कदम व सचिन आचरे यांनी म्हटले आहे. नवी मुंबईकरांनी मनसेच्या या शिवजनसंपर्क अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन गजानन काळे यांनी केले आहे.

# वडवली येथे विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील वडवली येथे सुतार समाजातर्फे २५ वी भगवान श्री विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सुतार समाज व महिला मंडळ यांच्या संयुक्तपणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या इंद्र वर्सेस इंद्र या दोन अंकी तुफान विनोदी नाटकाला नाट्यप्रेमीनी भरभरून दाद दिली.



या कार्यक्रमांच्या अध्यक्ष स्थानी वडवली ग्रुप ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुरेश धुमाळ व उद्घाटन वडवली ग्रामपंचायत सदस्य सचिन किर यांच्या हस्ते करण्यात आले तर मिलिंद निवळकर, विनोद पिळवणकर, शरद मयेकर, अर्जून विरकर, सागर सुतार, विश्वास सुतार, श्रेयश पिळणकर व अन्य मान्यवर उपस्थित होते. या नाटकाचे लेखन सुतार समाजातील अमित गुहागरकर व दिग्दर्शन आकाश तांबुटकर यांनी केले. उत्कृष्ट लेखन, दिग्दर्शन, संगित, नेपथ्य व प्रकाश– ध्वनी यामुळे नाट्यप्रेमींना एक वेगळी कलाकृती पाहावयास मिळाली.

या २५ व्या जयंती निमित्ताने सुतार समाजाच्या वतीने राजकीय व सामाजिक क्षेत्रात गेले अनेक दशके कार्यरत असलेले शशिकांत सुर्वे, वडवली गावात ग्रामविकास अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेले प्रज्योत सुर्वे, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांनी विधी दिलीप गुहागरकर आदींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. श्री विश्वकर्मा जयंती रौप्य महोत्सवी वर्ष उत्तम व यशस्वी साजरा करण्यासाठी सुतार समाजाच्या सर्व सदस्यांनी खुप घेतली याबद्दल व कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिलेल्या मान्यवरांचे, देणगीदारांचे व रसिकांचे सुतार समाजाचे अध्यक्ष अनंत निवळकर यांनी आभार व्यक्त केले.

# पोलादपूर येथे आपत्ती काळातील प्रशिक्षण शिबिर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार आगामी मान्सून मधील आपत्ती काळात प्रशिक्षित मनुष्यबळ तात्काळ उपलब्ध होण्यासाठी पोलादपूर शहरातील स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृहामध्ये तसेच मराठी प्राथमिक शाळा क्रमांक १च्या प्रांगणात दि. १७ आणि १८ फेब्रुवारी रोजी आपत्तीकाळातील प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.



नागरी संरक्षक दल उरण यांच्यामार्फत प्रशिक्षणाथाअना पुर तसेच दरडी कोसळण्याच्या घटनांमध्ये ग्रामस्थ अडकल्यास त्यांची सुटका करणे, जखमी व्यक्तीला प्रथमोपचार, दोरखंडाच्या विविध गाठीचा वापर संकट काळात करणे, स्ट्रेचरचा वापर, आगीवर नियंत्रण मिळवणे आदी बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले. पोलादपूरचे नायब तहसिलदार समीर देसाई, मंडल अधिकारी मुंडेकर, तलाठी तसेच पोलीस पाटील यांनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपत्तीकाळातील प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेतला.


## ग्रामपंचायत कानपोली

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि.१८/०२/२०२२

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कानपोली हद्दीतील १५ व्या वित्त आयोगांतर्गत खालील विकासकामे व साहित्य खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१९/०२/२०२२ ते २५/०२/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२८/०२/२०२२ रोजी दुपारी ११ वाजता निविदा उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कानपोली यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | नग | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | Kanpoli Plastic Waste Storage | ०५ | ३३५०१/– | |
| २ | Hedutane Plastic Waste Storage | ०५ | ३३५०१/– | |
| ३ | कानपोली येथे ४ युनिट सार्वजनिक शौचालय बांधणे | ०१ | २९९७३३/– | २९९७/– |
| ४ | हेदुटणे येथे ४ युनिट सार्वजनिक शौचालय बांधणे | ०१ | २९९७३३/– | २९९७/– |
| ५ | एलईडी व दिवाबत्ती साहित्य खरेदी करणे | ०१ | १००००००/– | १०००/– |
| ६ | धुर व औषध फवारणी करणे | -- | ५००००/– | |
| ७ | कानपोली नाला सफाई करणे व गाळ काढणे | -- | ५००००/– | |

**अटी व शर्ती :–**

१.भरलेल्या सीलबंद निविद/कोटेशन दिनांक १९/०२/२०२२ ते २५/०२/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

२.आलेल्या निविदा दि. २८/०२/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील .

३.मंजूर दुकानदारास वस्तू दिल्याशिवाय पैसे दिले जाणार नाहीत.

४.निविदा/कोटेशन पोष्ठाने दिनांक २५/०२/२०२२ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत ग्रामपंचायत कार्यालयामध्य पोहचतील त्यांचा विचार करण्यात येईल व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा /कोटेशन स्वीकारल्या जाणार नाहीत.

५.सदर जाहिरातीमधील अनुक्रमांक १ ते १२ व १ ते १० नुसार मागविण्यात आलेल्या साहित्याचे, दुरुस्तीचे, उपसणे यांचे कोटेशन हे वर्षभरासाठी असेल.

६.नियमा प्रमाणे सर्व शासकीय भरणा करावा लागेल.

७.अधिकृत ठेकेदारांनी/दुकानदारांनी निविदा/कोटेशन न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केले जाईल.

८.कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, बिलातून कपात केली जाईल.

९.वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून/दुकानदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.

१०. निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील .

११.निविदा/कोटेशन मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरु करणे बंधनकारक आहे.

१२.निविदा/कोटेशन मंजूर केल्यावर रु.५००/– चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.

१३.सुरक्षा अनामत रक्कम ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा/वस्तूचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१४.निविदा/कोटेशन धारका कडे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.

१५.अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्वीकृत राहील.

१६.निविदा मंजूर केलेल्या प्रमाणे काम करण्यात यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.

१७.कमीत कमी दराची निविदा/कोटेशन मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.

१८.निविदा मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सही/– ग्रामसेवक ग्रामपंचायत कानपोली**

**सही/– सरपंच ग्रामपंचायत कानपोली**


# ट्रकच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने पायी चालत जाणाऱ्या ईसमास धडक दिली. यात २६ वर्षीय अमीर मालो कांधो (देवीचा पाडा) याचा मृत्यू झाला. आरोपीविरोधात तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमीर कांधो हा वावंजे–पनवेल रोडवर देवीचापाडा येथून जात होता. यावेळी हायवा ट्रक एमएच ४३ वाय २३३८ वरील चालकाने त्याच्या ताब्यातील हायवा भरधाव वेगाने चालवली व आमीर याला पाठीमागून धडक दिली.

या धडकेत आमिर कांधो याचा जागीच मृत्यू झाला. यावेळी हायवा चालक पळून गेला आहे.


कोर्ट – मा.इंदलकर साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.जगदीश ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साहेब प्रथमवर्ग यांचे कोर्टात
क्रिमिनल चौकशी अर्ज नं.१२९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२१/०३/२०२२

सौ.वृषाली महेंद्र पाटील
वय : ३४ वर्षे
रा.दादरपाडा, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका पनवेल
कळंबोली विभाग, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार ही राहणारी मौजे : दादरपाडा, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड येथील रहिवाशी असून अर्जदार हिचे पंजोबा कै.हिऱ्या दगड्या ठाकूर यांचा मृत्यू दि.०६/०८/१९५४ रोजी मौजे : रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. अर्जदार हिचे पंजोबा कै.हिऱ्या दगड्या ठाकूर यांच्या मृत्यूची नोंद कुठेच नाही. तसा दाखला पनवेल महानगरपालिका पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांनी दिलेला आहे. सबब अर्जदार यांनी जन्म–मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची उशिरा नोंद करून मिळण्याबाबत संबंधित पनवेल महानगरपालिका पनवेल, ता.पनवेल यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत याकरिता अर्जदार सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल करीत आाहेत.

वरील अर्जदार हिचे पंजोबा कै.हिऱ्या दगड्या ठाकूर यांचा मृत्यूचा दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास मृत्यूचा दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.१८/२/२०२२ रोजी कोर्टाच्या सही–शिक्क्याने दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल



कोर्ट – मा.इंदलकर साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.जगदीश ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साहेब प्रथमवर्ग यांचे कोर्टात
क्रिमिनल चौकशी अर्ज नं.१२८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२१/०३/२०२२

सौ.वृषाली महेंद्र पाटील
वय : ३४ वर्षे
रा.दादरपाडा, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका पनवेल
कळंबोली विभाग, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार ही राहणारी मौजे : दादरपाडा, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड येथील रहिवाशी असून अर्जदार हिचे पंजोबा कै.जान्या दगड्या ठाकूर यांचा मृत्यू दि.१५/०९/१९५० रोजी मौजे : रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. अर्जदार हिचे पंजोबा कै.जान्या दगड्या ठाकूर यांच्या मृत्यूची नोंद कुठेच नाही. तसा दाखला पनवेल महानगरपालिका पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांनी दिलेला आहे. सबब अर्जदार यांनी जन्म–मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची उशिरा नोंद करून मिळण्याबाबत संबंधित पनवेल महानगरपालिका पनवेल, ता.पनवेल यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत याकरिता अर्जदार सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल करीत आाहेत.

वरील अर्जदार हिचे पंजोबा कै.जान्या दगड्या ठाकूर यांचा मृत्यूचा दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास मृत्यूचा दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.१८/२/२०२२ रोजी कोर्टाच्या सही–शिक्क्याने दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल